Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.०४ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## रहेमत नगर भागात पाच महिन्यापासून पाण्याचा एक थेंबही नाही!

बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषदेचा भोंगळा कारभार मागील अनेक दिवसांपासून बीड शहरातील सुजाण नागरिक पाहत आहे. पण एक फुल पेन जाहिरात पाण्याचे साठे मुबलक असतानाही शहराला आठ दिवस आड पाणी येत आहे तर अनेक भागात पाण्याचा खळखळाट आहे. शहरातील मध्यवस्तीच्या पाठीमागे रहेमत नगर आहे. या भागातील नागरिकांना मागील पाच महिन्यापासून पिण्याच्या पाणी च एक थेंबही मिळालेला नसल्याने या भागातील नागरिकांना रहेमत नगर भागात पाच महिन्यापासून पाण्याचा एक थेंबही नाही! कोर्ट समोरील मुख्य रस्त्यावर पाईपलाईनचे काम रखडले प्रशासनाचे दुर्लक्ष ! पाणी खरेदी करून घ्यावे लागत असल्याने नगरपालिके च्या ढिसाळ कारभारामुळे रहमत नगर भागातील नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावे लागत आहे.

# बीड जिल्ह्यातील दिव्यांगांना मिळणार मोफत फिरते वाहन दुकान

## योजनेचा लाभ घेण्यासाठी ६ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करावेत-जे.डी.शाह



बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाअंतर्गत हरित ऊर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाइल ऑन ई- व्हेइकल) मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील विविध प्रकारच्या व्यवसाय सुरू करण्यासाठी फिरते वाहन दुकान योजनेचा लाभ घेण्यासाठी विविध प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या व इच्छाशक्ती असणाऱ्या दिव्यांगांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख येत्या ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे प्रसिद्ध पत्रात पुढे म्हटले आहे की दिव्यांग वित्त व विकास महामंडळातर्फे १० जून २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.



सदर योजनेंतर्गत दिव्यांगांना रोजगारनिर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, हा उद्देश आहे. २.२५ लाख रुपयांचे मोबाईल व्हेइकल या योजनेंतर्गत १०० टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. यासाठी अर्ज भरण्यासाठी ६ फेब्रुवारीची अंतिम मुदतयोजनेचा लाभ गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणीची प्रक्रिया २२ जानेवारीपासून सुरू करण्यात आली असून, दिव्यांग व्यांग व्यक्तींकडून ६ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत पोर्टलवर सुविधादिव्यांगांना फिरते वाहन योजनेचा लाभ मिळविण्यासाठी https://register.mshfdc.co.in या लिंकवर अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. सदर लिंकवर क्लिक केल्यानंतर दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे पोर्टल उघडले जाते. त्यानंतर अर्ज भरण्याची सुविधा यात देण्यात आली आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की दिव्यांगांना लाभ घेण्यासाठी पुढील प्रमाणे अटी, शर्थी व अटी लागु करण्यात आले आहे. यासाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले किमान ४०% दिव्यंगत्वाचे प्रमाणपत्र असावे, अर्जदार १ जानेवारी २०२४ या दिनांकाच्या दिवशी १८ ते ५५ या वयोगटातील असावा.मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत पालक अर्ज करण्यास सक्षम असतील, दिव्यांग अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख पेक्षा अधिक नसावे, अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालवण्याचा परवाना नाकारल्यास परवानाधारक नसलेल्या अतितीव्र व्दिव्यांगाच्या सोबतच्या सहाय्याने फिरता मोबाईल व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील गरजु दिव्यांगांनी तात्काळ ऑनलाईन अर्ज दाखल करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी केले आहे.

# भुमिपुजन सोहळा; आष्टीतील दोन्ही कार्यक्रमास उपस्थित रहा

## जि.प.सदस्य ॲड.प्रकाश कवठेकर यांचे अवाहन

बीड । दिव्य न्युज

आ.सुरेश धस यांच्या अथक प्रयत्नातून कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन क्र.३ शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी तसेच बोगदा कामाचे भुमीपुजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या हस्ते होत आहे. याच बरोबर श्री.मच्छिंद्रनाथ समाधी मंदिर बांधकाम भुमिपुजन समारंभ आयोजीत केला आहे. या दोन्ही कार्यक्रमास कार्यकर्ते, शेतकरी, भाविक भक्तांनी उपस्थित रहावे, असे अवाहन डोंगरकिन्ही गटाचे जिल्हा परिषद सदस्य ड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, आष्टी हा कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. येथील शेतकऱ्यांच्या जिवनात हरितक्रांती व्हावी, असे स्वप्न आ.सुरेश धस यांनी काही वर्षांपुर्वी पाहिले आणि पाहिलेले स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.या प्रयत्नाला आता फळ दिसत असून कृष्णा मराठा सिंचन प्रकल् अंतर्गत आष्टी उपसा सिंचन क्र.३ शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामांची पाहणी तसेच बोगदा कामाचे भुमिपुजन आज होत आहे. सदरील कार्यक्रम हा दि.५ रोजी सकाळी ११.३० वाजता खुंटेफळ येथे होत आहे. तर लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.मच्छिंद्रनाथ समाधी मंदिर बांधकामाचे भुमीपुजन दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता मच्छिंद्रनाथ गड सावरगाव मायंबा येथे होत आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ.मोनिका राजळे, आ.संग्राम जगताप, ह.भ.प.मधुकर महाराज शास्त्री, ह.भ.प.बबन महाराज बहिरवाळ, अशोक पालवे महाराज, मस्तनाथ महाराज, ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, मा.आ.साहेबराव दरेकर यांची उपस्थिती राहणार आहे. या दोन्ही कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते, शेतकरी आणि गडाच्या भाविक भक्तांनी उपस्थित रहावे, असे अवाहन जि.प.सदस्य ॲड.प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

# पिंपळेश्वर माध्य उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळा यांचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न

पिंपळा । दिव्य न्युज

आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे पिंपळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते मुलांच्या कलागुणांचा प्रत्यक्ष विकास व्हावा यासाठी पिंपळेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळा यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन ३० जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे ह.भ.प.गुरुवर्य धर्मभूषण.राऊत दादा महाराज व कार्यक्रमाचे




अध्यक्ष माणिकराव खटके हे होते.यावेळी प्रस्ताविक भाषण करताना शाळेचे प्राचार्य विधाते सर गुणवंत विद्यार्थ्यांचा आम्ही दरवर्षीच सत्कार करतो.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ह भ प धर्मभूषण गुरुवर्य राऊत दादा बोलताना म्हणाले मी सहा महिन्यांपूर्वी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमराव धोंडे साहेब पिंपळा येथे आले असता त्यांना विनंती केली की आमच्या गावातील मुली बाहेरगावी सायन्स शाखेसाठी जातात तर सायन्स शाखा पिंपळामध्ये चालू करावी असेही राऊत दादांनी बोलताना सांगितले. यावेळी मंचावर उपस्थित कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक.रामदास शेंडगे.माजी सरपंच.अनफट आजिनाथ.युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष.युवराज खटके.जगन्नाथ अरुण.बापू शिंदे.भरत गायकवाड.शिंदे डी.के.जगधने अजिनाथ.खटके भाऊ.सुबे सचिन.बाबा भिटे.योगेश शेळके.खटके विलास.शेंडगे चंद्रकांत.गावडे धनराज.आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

# कैलास दहातोंडे यांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सरचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन-बाळराजे तळेकर

## ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदवले ता.माण जि.सातारा या ठिकाणी महामंडळ सभा संपन्न..!

बीड । दिव्य न्युज

शिक्षक नेते श्री.संभाजीराव थोरात तात्या यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची महामंडळ सभा नुकतीच गोंदवले ता. माण जि. सातारा याठिकाणी ग्रामविकास मंत्री ना.श्री.जयकुमार गोरे भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्यभरातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते मराठवाड्याचे भूमिपुत्र, युवा अभ्यासू शिक्षक नेतृत्व श्री. कैलास दहातोंडे यांची एकमताने राज्य सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे राज्यभरातून अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्राथमिक शिक्षक संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह सातारा जिल्ह्याचे माजी खासदार श्री. रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार श्री.अतुल भोसले, आमदार श्री.मनोज दादा घोरपडे, आमदार श्री.सचिन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ही लाखो सभासद असणारी राज्यातील एक प्रमुख संघटना असून गेली तीस वर्षे या संघटनेचे नेतृत्व श्री. संभाजीराव थोरात तात्या हे करतात. प्राथमिक शिक्षक संघ ११० वर्षाचा इतिहास असणारी, स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली संघटना असून, यापूर्वी या संघटनेचे नेतृत्व कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा, आचार्य अत्रे, आचार्य दोंदे, ग.श्री. खैर, शिवाजीराव पाटील अण्णा अशा नामवंत व्यक्तिमत्त्वांनी केलेले आहे. त्यामुळे प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या निवडीकडे राज्याचे लक्ष लागलेले असते. अशा या भव्य दिव्य व ऐतिहासिक व्यासपीठावर मराठवाड्याचे भूमिपुत्र श्री.कैलास दहातोंडे यांची राज्य सरचिटणीस पदी एक मताने निवड झाली आहे, ही बाब मराठवाड्यासाठी भूषणावह असून राज्यभरातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे. कैलास दहातोंडे गेली वीस वर्षापासून प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न राज्यस्तरावर अभ्यासपूर्वक मांडून सोडवून घेण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे राज्याने पाहिले आहे. ते एक अभ्यासू व शांत संयमी व्यक्तिमत्व असल्यामुळेच मराठवाड्याला हा बहुमान मिळाला आहे. मराठवाडाच नाही तर राज्यभर त्यांचा खूप मोठा मित्रपरिवार असून ते शिक्षणासोबतच सामाजिक कार्यामध्येही अग्रेसर असतात. शिक्षकांचे प्रश्न सोडवत असतानाच राज्यभरातील गोरगरीब, वाडी, वस्ती, तांडा व खेडेगावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार भौतिक सुविधा व शिक्षण मिळावे यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात. शासन दरबारी विद्यार्थी, शिक्षक व शाळा यांचे अभ्यासपूर्वक प्रश्न मांडून सोडवून घेण्याची कला त्यांच्याकडे असल्यामुळे या निवडीचे राज्यभरातून मोठ्या आनंदाने स्वागत झाले आहे. त्यांचे मनस्वी अभिनंदन! व पवित्र अशा शिक्षण क्षेत्रातील वाटचालीस खूप साऱ्या शुभेच्छा...!!



# झिरो शिक्षाकी शाळेचे विद्यार्थिनी सांस्कृतिक कार्यक्रममध्ये उत्कृष्ट कामगिरी



परळी । दिव्य न्युज

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू गाढे पिंपळगाव तालुका परळी जिल्हा बीड येथे उर्दू शाळेचे विद्यार्थ्यांनी दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी आठ वाजता पि.एम श्री शाळांमध्ये प्रजासत्ता दिवस निमित्त संस्कृत कार्यक्रम घेण्यात आला यावेळी उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वतःहून सराव करून एक उत्कृष्ट सांग विथ क्शन घेऊन गाढे पिंपळगावचे मान्यवरांच्या व सर्व गाववाल्यांचा मन जिंकलं व या शाळेबद्दल त्यांची बघण्याची दृष्टी बदलली पण शिक्षण विभागाचे मा सी ओ साहेब व शिक्षण अधिकारी साहेबांच्या नजरेने समोर कधी जाणार व त्यांना कधी शिक्षक देता येणार याची हे विद्यार्थी वाट पाहत आहे एप्रिल २०२४ पासून या शाळे चे शिक्षक मुजफ्फर सर यांच्या निधन झाला व त्या महिन्यापासून तिथे शिक्षक नाही तरी माझे या माध्यमातून सर्व संघटनांनी पुढाकार घेऊन पुन्हा एकदा विनंती आहे की या शाळेत किमान एक शिक्षक देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान टाळावे. हिचं शेवटची विनंती

# धनादेशाचा अनादर केल्यामुळे तालुका कोर्टाने दिलेली शिक्षा व ८ लाखांचा दंड प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने केला रद्द- ॲड.अविनाश गंडले



बीड । दिव्य न्युज

धनादेशाचा अनादर केल्यामुळे तालुका न्यायालयाने दिलेली शिक्षा व ८ लाख रूपयांचा दंड प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने रद्द केल्याची माहिती ॲड.अविनाश गंडले यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आरोपी जावेद रहीम सय्यद हा पुणे येथे मजुरी कामासाठी गेला होता. त्या ठिकाणी त्याची ओळख फिर्यादी सोबत झाली. त्यावेळी फिर्यादी हा शिक्षण घेण्यासाठी पुणे येथे गेला होता, हे दोघे जण शेजारी राहत असल्यामुळे ओळख झाली. त्यानंतर फिर्यादीकडुन आरोपीने रुपये ५,००,०००/- घर बांधकामासाठी हातऊसणे घेतले व सदरीलची रक्कम मुदतीत दिली नाही. म्हणून फिर्यादीने आरोपीने दिलेला धनादेश दिनांक १६/ ११/ २०१५ रोजी बँकेत वटवण्यासाठी टाकला असता तो अनादरीत झाला. त्यामुळे फिर्यादीने प्रथमवग न्यायदंडाधिकारी श्रीमती के.सी. बागल यांच्याकडे प्रकरण दाखल केले. सदरील प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्याकडुन युक्तीवाद झाला. त्यावेळी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती के.सी. बागल यांनी आरोपीस कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट नुसार ६ महिने शिक्षा व रक्कम रुपये ८,००,०००/ - फिर्यादीस देण्यास सांगितली व तीन महिन्यात रक्कम दिली नाही. ६ महिने शिक्षा अशा प्रकारचा निर्णय दिला. सदरील प्रकरणात आरोपी जावेद सय्यद यांनी बीड जिल्हा न्यायालयातील नामांकीत विधीज्ञ ॲड. अविनाश पं. गंडले यांच्या मार्फत अपील दाखल केले. त्यामध्ये दोन्ही बाजुचा युक्तीवाद घेवुन व उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे ग्राह्य धरुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, बीड यांनी दिनांक ०१/०२/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपी तर्फे ॲड. अविनाश गंडले यांनी काम पाहीले, त्यांना ॲड. विशाल वडमारे, ॲड. इम्रान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. सचिन गिरी, ॲड. राजेश शिंदे यांनी सहकार्य केले.

# नेकनुर कुटीर रुग्णालय इमारतीच्या स्लॅबची प्लेट कोसळून मजुराचा मृत्यु

नेकनूर । दिव्य न्युज

नेकनूरच्या कुटीर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे यावेळी स्लॅबची प्लेट अंगावर पडल्याने सोमवारी शंभु दास (वय ३८) या मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला. काम उरकण्याची गडबड दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी असून कमी कालावधीत तिसरा स्लॅब टाकण्याचे गुत्तेदाराचे धोरण मजुरासाठी जीवघेणे ठरल्याचे बोलले जात आहे.



नेकनूर कुटीर रुग्णालयाच्या तीन मजली नवीन इमारतीच्या कामात सुरुवातीपासूनच दर्जा ढासळल्याचे पाहायला मिळाले. इतर ठिकाणाहून कॉंक्रीट मिक्स करून या ठिकाणी वापरले जात असल्याने या कामाच्या दर्जाबाबत सुरवातीपासूनच प्रश्न उभा राहिला, मात्र संबंधित गुत्तेदाराने मनमानी कायम ठेवत काम उरकण्याचा सपाटा सुरू ठेवला. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी एका परराज्यातील मजुराला यामुळे जीव गमावा लागला. पश्चिम बंगाल येथील शंभू दास या मजुराचा स्लॅब खोलताना प्लेट डोक्यात पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे या कामावर मजुराच्या सुरक्षेची कुठली काळजी घेतली गेली नसल्याचे समोर आले. परराज्या मोठ्या प्रमाणात मजूर या ठिकाणी काम करीत आहेत.



दिव्य वार्ता
मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५ | ४

# 'जात बदनाम होतीये, गुन्हे करायचे अन्....; आव्हाडांचा पुन्हा एकदा मुंडेंवर हल्लाबोल



मुंबई । दिव्य न्युज
बीड जिल्ह्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं असून, राजकीय आरोप -प्रत्यारोप देखील सुरू असल्याचं पाहायला मिळत आहेत. आज पुन्हा एकदा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'गुन्हा केल्यानंतर जाती आड का लपता? मी जातीवंत वंजारी आहे. माझ्या कुटुंबाने हमाली केली. तुम्ही आणि वाल्मिक कराड यांनी केलेल्या कृत्यामुळे जात बदनाम होत आहे,' असं आव्हाड यांनी म्हटलं आहे. 'गुन्हा केल्यानंतर जाती आड का लपता? मी जातीवंत वंजारी आहे. माझ्या कुटुंबाने हमाली केली. तुम्ही आणि वाल्मिक कराड यांनी केलेल्या कृत्यामुळे जात बदनाम होत आहे, याच्यावर हल्ले झाले, त्याच्या हत्या झाल्या. जा लोकांचा छळ झाला ते लोक वंजारी नाहीत का?







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफिससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०